प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ३ ऑक्टोबर २०२४**

**नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ च्या स्थानकांवरील वाणिज्यिक जागांचा वापर करण्याची सुवर्णसंधी**
**सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ च्या स्थानकांवरील वाणिज्यिक क्षेत्रांचे अनुज्ञप्तीकरण करण्यासंदर्भातील कार्यशाळेचे आयोजन**

नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ च्या स्थानकांवर विकसित करण्यात आलेल्या वाणिज्यिक जागांच्या वाणिज्यिक क्षमतांचे अनुज्ञप्तीकरण करण्याच्या उद्देशाने, सिडकोतर्फे सोमवार, ०७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता नवी मुंबई मेट्रो, सेंट्रल पार्क स्थानक, खारघर, नवी मुंबई येथे 'नवी मुंबई मेट्रो मार्ग क्र. १ च्या स्थानकांवरील वाणिज्यिक जागांचे अनुज्ञप्तीकरण' या विषयावर कार्यशाळाचे आयोजन करण्यात आले आहे.

सिडकोतर्फे नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत ११ स्थानकांसह ११.१ कि.मी. लांबीचा मेट्रो मार्ग क्र. १ विकसित करण्यात आला आहे. १७ नोव्हेंबर २०२३ पासून या मार्गावर मेट्रो सेवा सुरू झाली असून प्रवाशांचा उत्तम प्रतिसाद या सेवेला लाभत आहे. मेट्रोमुळे नवी मुंबईला उत्तम कनेक्टिव्हिटी लाभली आहे. वर्तमानात विकसित करण्यात येत असलेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, कॉर्पोरेट पार्क आणि लॉजिस्टिक पार्क प्रकल्पांमुळे नवी मुंबई हे व्यवसायाकरिता आश्वासक केंद्र म्हणून प्रसिद्धीस आले आहे.

सिडकोतर्फे मेट्रो मार्ग क्र. १ वरील स्थानकांवर वाणिज्यिक जागा विकसित करण्यात आल्या आहेत. या वाणिज्यिक जागांच्या क्षमतांचा वापर चलनीकरणासाठी करण्याकरिता उपरोक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये सहभागी होणाऱ्यांना सिडकोच्या मेट्रो मार्ग क्र. १ ची ओळख, संरेखन आणि मुंबई महानगर प्रदेशातील प्रादेशिक कनेक्टिव्हीटीकरिता त्याचे महत्त्व, मेट्रो स्थानकांवर भाडेपट्ट्यावर उपलब्ध असलेल्या किरकोळ व वाणिज्यिक जागांकरिता अनुज्ञापन संधी, निविदा प्रक्रिया, पात्रतेचे निकष, इ. मुद्द्यांबद्दल माहिती देण्यात येणार आहे. तसेच निविदाकारांकडून देण्यात येणाऱ्या सूचनांवरही चर्चा करण्यात येणार आहे. कार्यशाळेनंतर मेट्रो स्थानकांना भेट देण्यात येणार आहे.

प्रत्येक मेट्रो स्थानकावर ४० चौ.मी. च्या अंतर्गत वाणिज्यिक जागा व ५ स्थानकांवर ७,०६५ चौ.मी. चे क्षेत्र बाह्य वाणिज्यिक क्षमतांसाठी उपलब्ध आहे. अंतर्गत वाणिज्यिक जागांचा वापर हा क्विक फुड अ‍ॅण्ड बिव्हरेज, किरकोळ, इलेक्ट्रॉनिक्स, पुस्तकांचे दुकान, पुष्पविक्रेता, कपड्याचे दुकान, भेटवस्तूचे दुकान इ. करीता करता येणार आहे. तर बाह्य वाणिज्यिक जागेचा वापर हा सुपरमार्केट, क्विक फुड अ‍ॅण्ड बिव्हरेज, किरकोळ, इलेक्ट्रॉनिक्स, कार शो रूम, स्टोअर्स, कॉर्पोरेट कार्यालये इ. करीता करता येणार आहे.

सिडकोतर्फे मेट्रो स्थानकांवर विकसित करण्यात आलेल्या वाणिज्यिक जागांचा वापर करून आपला व्यवसाय वाढवण्याची सुवर्णसंधी किरकोळ जागांसाठी इच्छुक निविदाकार, विकासक, व्यावसायिक आणि विक्रेते यांना उपलब्ध झाली आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**